शुक्रवार दि.२८ जून २०२४
किंमत २ रुपये । महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०१ अंक : ३००
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

# दैनिक बीड लोकनेता

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे



सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४



Email : elokneta@gmail.com | Lokneta News - लोकनेता न्युज | 8459977904 | www. lokneta.com


# सभागृहात आणि सभागृहाबाहेर जनतेच्या प्रश्नांना न्याय देण्यासाठी प्रयत्नशील राहिलो-सुरेश धस

## सुरेश धस यांचा सहा वर्षाचा कार्यकाल पूर्ण झाल्याने विधानभवनात निरोप समारंभ

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

भारत देशाचे सर्वात यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी केंद्रीय गृहमंत्री अमितभाई शहा, भारतीय जनता पार्टी अध्यक्ष जे.पी.नड्डा तसेच माजी मुख्यमंत्री,उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस,भा.ज.पा.राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे यांच्या आशीर्वादामुळे धाराशिव तथा लातूर/बीड या स्थानिक प्राधिकारी मतदारसंघ कार्यक्षेत्राचा विधान परिषद सदस्य म्हूणन जबाबदारी मिळाली या माध्यमातून धाराशिव बीड आणि लातूर या तीनही जिल्हातील जनतेच्या प्रश्नांना न्याय मिळण्यासाठी प्रयत्न केला सभागृहात आणि सभागृहाबाहेर जनतेच्या प्रश्नांना न्याय देण्यासाठी प्रयत्नशील राहिलो असे मनोगत आ.सुरेश धस यांनी केले.



धाराशिव,लातूर,बीड स्थानिक स्वराज्य संस्थेच्या विधान परिषदेचा सहा वर्षाचा कार्यकाल पूर्ण झाल्याने विधानभवनात निरोप समारंभ प्रसंगी ते बोलत होते.ते पुढे बोलताना म्हणाले की,वास्तविक पाहता या मतदारसंघात भारतीय जनता पार्टीला यापूर्वी कधीही यश प्राप्त झालेले नव्हते एक आव्हान म्हणून हे स्वीकारले आणि सर्व पक्षश्रेष्ठी मतदारसंघातील जवळच्या कार्यकर्ते यांच्या अथक परिश्रमामुळे विजयश्री खेचून आणला.या माध्यमातून धाराशिव,बीड आणि लातूर या तीनही जिल्हातील जनतेच्या प्रश्नांना न्याय मिळण्यासाठी प्रयत्न केला .अगदी कोविड-१९ या रोगाच्या प्रादुर्भावामुळे जनतेवर मोठे संकट आले असतानाही कोणतेही कधीही शांत बसलो नाही. सभागृहात आणि सभागृहाबाहेर जनतेच्या प्रश्नांना न्याय देण्यासाठी प्रयत्नशील राहिलो. पक्ष नेतृत्वाने दिलेल्या वेळोवेळी सूचना आणि आदेश प्रमाण मानून प्रधान मंडळाच्या वरिष्ठ सभागृहाच्या माध्यमातून शेतकरी, शेतमजूर, ऊसतोडणी कामगार, दूध उत्पादक शेतकरी यांच्यासह सर्वसामान्य जनतेचा विकास साधायचा प्रयत्न केला असे शेवटी धस म्हणाले. बीड-धाराशिव आणि लातूर स्थानिक स्वराज्य संस्थेमधून विधानपरिषद सदस्याचा आ.सुरेश धस यांचा कार्यकाळ नुकताच संपला.विधान परिषदेत सभापती डॉ.नीलमताई गोऱ्हे यांनी विधिमंडळात आयोजित केलेल्या विधानपरिषद सदस्यांच्या निरोप समारंभास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे,उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,उपमुख्यमंत्री अजित पवार,विरोधी पक्षनेते अंबादास दानवे,विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

**सुरेश धस यांना मी खरं म्हणजे मनापासून धन्यवाद देतो त्यांनी एखादा विषय घेतला तो धसाच लावायचा नावाप्रमाणेच..अशी त्यांच्या कामाची पद्धत असून एखादा ज्वलंत विषय जो असतो तो कसा मिटेल त्याला काय केलं पाहिजे त्याला कोणी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री किंवा त्याच्या संबंधित मंत्र्यांनी केला पाहिजे याचा पाठपुरावा ते करतात हे मी जवळून पाहिला आहे.त्यांनी विधानपरिषद सभागृहात अतिशय चांगले काम केले असून यापुढेही ते करतील.धस यांनी केलेली अपेक्षा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांच्याकडे केली आहे.त्याचा उपमुख्यमंत्री नक्कीच विचार करतील .धस यांच्यासारख्या चांगले सदस्यांची सभागृहाला त्यांची आवश्यकता आहे.त्यांच्या वाचन आणि भाषण शैली देखील चांगली असून त्यांच्या सभागृहातील भाषणाचा नेहमी धसका लोक घेतात.सर्व विषयात रस त्यांचे नाव सुरेश धस.**

**एकनाथ शिंदे,मुख्यमंत्री**

**नुसता अभ्यास नाही तर ते मांडण्याची जी आग्रही वृत्ती आहे ती आग्रही वृत्ती आमदार सुरेश धस यांच्यात असून हे सगळं करत असताना जमिनीशी जी नाळ आहे.अभ्यासू वृत्ती असून चालत नसून त्याला प्रॅक्टिकली असणं फार गरजेचे आहे ते आमदार सुरेश धस मध्ये पाहायला मिळतं आणि ते प्रॅक्टिकल नॉलेज आमदार सुरेश धस यांच्यात आहे. येणाऱ्या काळात आपल्या बाबत जो निर्णय घेयचा आहे तो आम्ही सर्व मिळून नक्कीच घेऊ**

**ना.देवेंद्र फडणवीस , उपमुख्यमंत्री**

**सुरेश धस यांना देखील मी आमदार म्हणून काम करण्याची संधी दिली. काही काळासाठी त्यांना राज्यमंत्री पदाची संधी देखील मी त्यांना दिली. त्यांनी विविध खात्याची मंत्री पदाची जबाबदारी अतिशय जबाबदारीने सांभाळली. राजकारणात अनेक वर्तुळे त्यांनी पार केली असूनउ तरुणपणात सरपंचपदापासून त्यांनी अनेक पदे भूषवले.**

**अजित पवार उपमुख्यमंत्री**

**सुरेश धस म्हणजे एक चालतं बोलतं विद्यापीठ ...सगळ्या विषयांचा ज्ञान आणि ते पण सर्वसामान्यांच्या बोलीभाषेत त्यांचा आहे धस यांची या सभागृहाला नक्कीच कमी जाणवेल..आमदार धस यांनी देवेंद्रजी फडणवीस यांच्याकडे ची अपेक्षा व्यक्त केली आहे ते नक्कीच देवेंद्रजी ठरवतील मात्र या सभागृहात आमदार सुरेश धस हे असणे हे त्यांचे व्यक्तिमत्व आहे.ते नक्कीच पुढच्या वेळेस या सभागृहात असतील आज मी मनमोकळेपणाने बोलतोय पक्षाच्या विचाराचा प्रोटोकॉल तोडून बोलतोय हे मला नक्कीच कळतेय मात्र त्यांची या सभागृहाला आवश्यकता आहे..**

**ना.अंबादास दानवे ,विरोधी पक्षनेते**

# तालुक्यातील गोरगरीब कष्टकरी कामगार शेतकरी यांचे हक्काचे अन्नधान्य चालू करा

## भाविक भगत हेल्प फाउंडेशन युवा ब्रिगेड यांनी उपविभागीय अधिकारी यांना दिले निवेदन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरखेड । सय्यद रहीम रजा**

तालुक्यातील काही राशन कार्ड धारकांना आतापर्यंत कुठलाही प्रकारचा अन्नधान्य मिळत नाही शासनाच्या या योजनेपासूनही अजून लोक वंचित आहेत. अन्न, वस्त्र, निवारा, या मानवाच्या मूलभूत गरजा असून सुद्धा आज अन्नापासून लोक वंचित आहेत जवळपास २००० ते ३०००कुटुंब असे आहेत ज्यांना अन्नाची उदरनिर्वाहासाठी अत्यंत गरज आहे. त्यामुळे आपण आपल्या स्तरावर या सर्व बाबींचा पाठपुरावा करुन तात्काळ वंचिताचे असलेले राशनकार्ड चालू करावे व



गोरगरीबांच्या हक्काच अन्नधान्य त्यांना मिळवून द्यावे हि आपणास नम्र विनंती. जर तात्काळ चालू न झाल्यास या संदभति होणाऱ्या उपोषण, आंदोलनाला आपण पूर्णपणे जबाबदार राहणार, याची नोंद घ्यावी. रेशन कार्ड धारकांना अन्नधान्य चालू करा असे निवेदन उमरखेड उपविभागीय अधिकारी यांना निवेदन भाविक भगत हेल्प फाउंडेशन युवा ब्रिगेड यांनी दिले.

## राजश्री शाहू महाराज यांच्या जयंती निमित्त

# राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी उदगीरच्या वतीने अभिवादन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उदगीर । सुनिल बस्वराज हावा**

उदगीर राजश्री शाहु महाराज यांच्या जयंती निमित्त उदगीर येथील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने राजर्षी शाहु महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे श्याम डावळे, शहर अध्यक्ष सय्यद जानीमियाँ, माजी सभापती सिद्धेश्वर पाटील, माजी नगरसेवक अनिल मुदाळे,ता.कार्याध्यक्ष वसंत पाटील, व्यंकट बोईनवाड,राजकुमार चव्हाण,नवनाथ गायकवाड,



नरसिंग शिंदे,शफी हाशमी, प्रदीप जोंधळे,मदन पाटील, राहुल सुतार, अविनाश गायकवाड,सिद्धार्थ सुर्यवंशी, राहुल सोनवणे, सतीश कांबळे,बालाजी रणदीवे, बापू साळुंखे, आजम पटेल, अमजत पठान, युसुफ शेख आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

# आष्टीत बंद घरात तरुणाचा कुजलेल्या अवस्थेत मृतदेह आढळला

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी शहरातील माळी गल्ली येथे राहणाऱ्या तरूणाचा राहत्या घरात मयतस्थितीत कुजेलला मृतदेह आढळून आल्याची घटना मंगळवारी दुपारनंतर आढळून आला आहे.याप्रकरणी आष्टी पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.खंडु सदाशिव भोपळे वय-२९ रा.माळेगल्ली असे मयत तरूणाचे नाव आहे.याबाबत अधिक माहिती अशी की,खंडु सदाशिव भोपळे हा तरूण माळेगल्ली आष्टी येथे एकटाच वास्तव्याला होता.तो हॉटेल व्यावसायिक होता.दरम्यान मंगळवारी २५ जून रोजी दुपारी ३ वाजता शेजारी राहणाऱ्यांना घरातून वास येत असल्याचे लक्षात येताच नातेवाईकांनी घर उघडून पाहिले असता मृतदेह आढळून आला हा प्रकार लक्षात आल्यानंतर पोलीसांना माहिती देण्यात आली.घराचा दरवाजा उघडताच त्याचा मयतस्थितीत मृतदेह कुजलेल्या स्थितीत आढळून आला.त्याच्या कोणत्या कारणामुळे मृत्यू झाला हे समोर आलेले नाही.याबाबत आष्टी पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.घटनास्थळी सहाय्यक पोलिस निरीक्षक नरवाडे, सहाय्यक पोलिस निरीक्षक हिंगे, पोलिस उपनिरीक्षक कृष्णा शिंदे,पो.ना.बांगर आदींनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला पुढील तपास पोलीस निरीक्षक संतोष खेतमाळस यांच्या मार्गदर्शनाखाली पोना बांगर हे करत आहेत.

# शहिद पार्क बनविण्यासाठी गावठाण जमिनीमधून जागा मिळावी

## त्रिदल सैनिक सेवा संघाच्या वतीने तहसीलदार यांना निवेदन



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

सदैव महासंकल्प माजी सैनिक बहुउद्देशिय संस्था देऊळगाव घाट,ता.आष्टी,जि.बीड रजि.नं. ऋ-००२६०२९ सुभेदार मेजर म्हतारदेव ठोंबरे सुभेदार रामचंद्र वायभासे (उपाध्यक्ष)नायब सुभेदार अदिनाथ घालमे (सचिव) शहिद पार्क बनविण्यासाठी गावठाण जमिनीमधून जागा देण्यात यावी अशी मागणी सदैव महासंकल्प माजी सैनिक संस्था देऊळगाव घाट ता आष्टी जि. बीड यांच्या वतीने उपजिल्हाधिकारी प्रमोद कुदळे साहेब पाटोदा यांना व आष्टीचे कर्तव्यदक्ष ना.तहसीलदार बाळदत्त मोरे यांना निवेदन देण्यात आले.

यावेळी ते म्हणाले आमच्या गांवचे भूमिपुत्र गणेश वाकचौरे शिलाँग (आसाम) मध्ये सेवा करीत असताना शहीद झाले (दि. ०१/०३/२०२४) (योध्या स्मरणार्थ व देशातील शहिद जवानांच्या स्मरणार्थ सहिद पार्कि बनविण्यासाठी जागा उपलब्ध (सर्व्हे नं. ५९) करावी हीच नम्र विनंती.त्रिदल सैनिक सेवा संघ महाराष्ट्र राज्य संस्थापक-अध्यक्ष अंकुश खोटे दादाच्या मार्गदर्शनाखाली निवेदन देण्यात आले.यावेळी नवनाथ भगत- तालुका त्रिदल अध्यक्ष,आष्टी बबन दहिफळे सहसचिव महाराष्ट्र राज्य,मनिष नरोडे - डायरेट्रर महाराष्ट्र राज्य,दादासाहेब ठोंबरे, दौलावडगांव गटप्रमुख- दादासाहेब दानवे संचालक, त्रिदल आबादास गंवड़े - सदस्य- त्रिदल आदिनाथ घालमे सदस्य - त्रिदल भरत मगर सदस्य,त्रिदल सैनिक सेवा संघाचे आदी पदाधिकारी उपस्थित होते

# अवैध्य रेती वाहतूक करणारा ट्रॅक्टर स्थानिक गुन्हेच्या पथकाने पकडून केली कारवाई

## गोरेगाव हद्दीतील घटना



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सेनगाव । महादेव हरण**

सेनगाव तालुक्यातील गोरेगाव हद्दीत अवैध्य रेती उपसा करणाऱ्या ट्रॅक्टर आज दिनांक २७ जून रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पकडून कारवाई केली असून यामध्ये एकूण मुद्देमाल पाच लाख ७५ हजार रुपयाचा माल जप्त करण्यात आला यावेळी स्थानिक गुन्हे शाखेचे उप,नि विठूबोने व गोरेगाव पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक हुंडेकर यांनी कारवाई केली.

संपादकीय

# घ्या जरा जलधडा...

मुंबईला पाणी पुरवठा करणाऱ्या अप्पर वैतरणा, मोडक सागर, तानसा, मध्य वैतरणा, भातसा, विहार, तुळशी या सात धरणांची पाणीसाठवण क्षमता १४ लाख ४७ हजार ३६३ दशलक्ष लिटर आहे. त्यांतून रोज तीन हजार ८५० दशलक्ष लिटर पाणीपुरवठा होतो. मुंबईची लोकसंख्या पाहता मुंबईची दैनंदिन पाण्याची गरज ही ४ हजार २०० दशलक्ष लिटर आहे. मात्र सध्या सात धरणांतून होणारा पाणीपुरवठा हा तीन हजार ८५० दशलक्ष लिटर आहे. त्यातही २५ ते ३० टक्के पाण्याची चोरी होणे, पाणी गळती हे होतच असते. काही वेळा विविध विकासकामांमुळे जलवाहिन्यांचे नुकसान होऊन बरेच पाणी वाया जाते. मात्र या पाण्याची किंमतही अनेकांना नाही. उन्हाळा आला की धरणांतील पाणीसाठा नजरेसमोर येतो आणि त्यानंतर पाण्याचे खरे मोल समजते. मुंबईला पाणी पुरवठा होत असतानाच जलवाहिन्यांमधून होणारी पाणीगळती हा महत्त्वाचा मुद्दा असून यातील ३० टक्के पाणी वाचवण्यासाठी मुंबई महापालिकेने प्रयत्न करायला हवेत. जलवाहिन्यांलगत असलेल्या झोपड्या, चाळींतून होणारी पाणीचोरी, भूमिगत किंवा रस्त्याला समांतर अशा जलवाहिन्यांमधून होणारी गळती आणि त्यांची सुरक्षा असे अनेक मुद्दे समोर येतात. या मुद्यांकडे आवर्जून लक्ष देणे गरजेचे आहे.मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या सात धरणांपैकी विहार आणि तुळशी वगळता अन्य धरणे ही मुंबईच्या हद्दीबाहेरच आहेत. तिथून सुमारे सव्वाशे ते दीडशे किमी अंतरावरून विविध जलवाहिन्यांद्वारे पाणीपुरवठा होतो. मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या या जलवाहिन्यांचे बाह्य विभागामध्ये सुमारे ३८० किलीमीटर अंतराचे अतिशय मोठे जाळे आहे. या जलवाहिन्या जंगल परिसर, दुर्गम भागातून मुंबईच्या दिशेने अंथरलेल्या आहेत. तसेच बहुतांश अंतरात त्या जमिनीखालीही आहेत. त्यामुळे पाणीगळती किंवा पाणीचोरी रोखण्यासाठी या जलवाहिन्यांची सुरक्षा आणि त्यांची देखभाल ही महत्त्वाची आहे. जलवाहिन्यांवर माती, गाळ, दमट हवामान, कचरा आणि इतर रसायने यांचा प्रतिकूल परिणाम होत असतो. त्यामुळे जलवाहिन्यांवर गंजदेखील चढतो. मोठ्या जलवाहिन्यांना जोडूनच पाणी वितरणासाठी अन्य जलवाहिन्याही जोडलेल्या असतात. त्यातूनही पाण्याची गळती होत असते. ५० ते १०० वर्षे आणि त्यापेक्षाही जुन्या असलेल्या जलवाहिन्या बदलून त्याऐवजी नवीन जलवाहिन्या टाकणे आणि जलवाहिन्यांचे मजबूतीकरण हा पर्याय आहे आणि तो मुंबई महापालिकेने निवडलाही आहे. त्याचे नियोजन होत असले तरीही प्रत्यक्षात मात्र दिसून आलेले नाही. मुंबईत सुरू असलेल्या विविध विकासकामांचा फटका जलवाहिन्यांना बसतो आणि गळती लागून पाणी वाया जाते. पाणीगळती, पाणीचोरी तसेच विविध विकासकामांमुळे जलवाहिन्या फुटणे याबाबतच्या २०२२ आणि २०२३ मध्ये ५५ हजारपेक्षा जास्त तक्रारी मुंबईकरांनी केल्या आहेत. त्या सोडवण्यातही आल्या. मात्र हे प्रमाण पाहता जलवाहिन्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर येतोच.

मुंबईत मोठ्या प्रमाणात होणारी पाण्याची नासाडी थांबवल्यास ऐन उन्हाळ्यात हेच पाणी उपयोगी पडेल. त्यामुळे विनाअडथळा सुरक्षिततरीत्या पाणीपुरवठा व्हावा, यासाठी जलबोगद्याचा पर्याय मुंबई महापालिकेने निवडला आहे. मुंबईत घाटकोपर ते परळ ११० किमी जलबोगद्याचे काम हाती घेतानाच पिसे पांजरापोळ जलशुद्धीकरण केंद्र ते मुलुंडपर्यंत २१ किमीचा जलबोगदाही तयार केला जाणार आहे.पाण्याची वाढती गरज भागवण्यासाठी समुद्राचे खारे पाणी गोडे करण्यासाठी मनोरी येथे नि:क्षारीकरण प्रकल्प, पाणीसाठा वाढवण्यासाठी गारगाई, पिंजाळ, दमणगंगा पिंजाळ नवीन धरण आणि सांडपाण्यावर तीन स्तरावर प्रक्रिया करून पाण्याचा पुनर्वापर हे प्रकल्प मुंबई महापालिकेने हाती घेतले. मात्र, गेली बरीच वर्षे विविध कारणांमुळे ते पूर्णत्वास जाऊ शकलेले नाहीत. स्वप्नवत असलेले हे प्रकल्प कधी पूर्ण होतील, हेदेखील माहिती नाही. त्यामुळे वाढती लोकसंख्या, पाण्याची गरज आणि उन्हाळा जवळ आल्यावर जाणवणारी पाणीटंचाई पाहता तातडीचे उपाय आधीच शोधणे गरजेचे आहे. यासाठी मुंबईकरांमध्ये पाणी बचतीसाठी वर्षभर जनजागृती झालीच पाहिजे. रहिवासी संकुल, शासकीय संस्था, हॉटेल, कारखाने, छोटे-मोठे उद्योग यांत ही जनजागृती रुजायलाच हवी. मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या सात धरणांतील पाणीसाठा दहा टक्क्यांच्या खाली जातो आणि पाणीटंचाईचे सावट मुंबईवर दाटू लागते. पाण्याची वाढती मागणी आणि वाढलेल्या उन्हामुळे पाण्याचे होणारे बाष्पीभवन यामुळे धरणांतील पाणी तळ गाठते, असे महापालिका अधिकारी सांगतात. मात्र नुकत्याच एका आकडेवारीतून राज्यातील मोठ्या, मध्यम आणि लघुसिंचन प्रकल्पातून दरवर्षी १६५ टीएमसी पाण्याचे बाष्पीभवन होत असल्याची माहिती राज्य सरकारच्या जलसंपदा विभागाच्या पाणी लेखापरीक्षण अहवालातून समोर आली. यातून मुंबईलाही तीन वर्षे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होऊ शकेल, एवढ्या प्रमाणात पाण्याची वाफ होत असल्याचे स्पष्ट झाले. मग या पर्यायाचा मुंबई महापालिकेकडून विचार का होताना दिसत नाही, हा प्रश्नच आहे. धरणातून विसर्ग होणाऱ्या पाण्याचा योग्यरीतीने वापर करण्याचा पर्यायही आहे. या पर्यायाचाही मुंबई महापालिकेकडून विचार होत असून विहार धरणातून विसर्ग करण्यात येणाऱ्या पाण्याचा योग्य रीतीने वापर करण्यासाठी ते पाणी भांडुप जलशुद्धीकरण केंद्रात वळवून ते पिण्यासाठी वापरण्याचा पर्याय निवडला आहे. यासाठी कंत्राटदाराचीही निवड केली असून तीन वर्षांत पूर्ण होणाऱ्या या प्रकल्पासाठी १०० कोटी रुपये खर्च येणार आहे. मुंबई महापालिकेकडून पाण्याची वाढती गरज भागवण्यासाठी गेली अनेक वर्षे प्रयत्न केले जात असताना त्याला यश मात्र कधी येणार, हे पाहावे लागणार आहे. अन्यथा भविष्यात मुंबईतही भीषण पाणीटंचाईचा धोका अटळ आहे.पाण्यासाठी विविध पर्याय अवलंबायला हवेत. मात्र त्याकडे साफ दुर्लक्षच केले जाते. एप्रिल आणि मेमध्ये पाण्याची काय परिस्थिती असू शकते, हे आपल्याला लक्षात येते. त्यामुळे आधीपासूनच पाणी बचतीचे संदेश द्यायला हवेत; पण तसे होत नाही. पाणी वापराचे नियोजन कुठेच होत नाही. रहिवासी संकुले, मोठ्या हॉटेलांतील स्विमिंग पूल, वॉटर स्पोटर्स तसेच अन्य ठिकाणचा पाण्याचा चंगळवादी वापर याकाळात थांबायला हवा. शिवाय पाणीचोरी, पाणीगळती रोखली तर २५ ते ३० टक्के वाया जाणारे पाणी आपल्याला उपलब्ध होईल.-प्रदीप पुरंदरे, जल अभ्यासक

# लोककल्याणकारी राज्यकर्ते-राजर्षी शाहू महाराज



ब्रिटिश राजसत्तेच्या काळामध्ये सामान्य जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी व बहुजन समाजाच्या सामाजिक उन्नतीसाठी या काळात शाहू राजांनी प्रयत्न केले, सामाजिक परिवर्तनाला गती प्राप्त करून दिली, तसेच सनातनी वर्गाच्या विरोधाला न जुमानता दलित (अस्पृश्य) व मागासवर्गीय समाजाच्या विकासासाठी महत्त्वाची भूमिका बजावली. महाराजांना राजर्षी ही पदवी त्यांच्या राज्यभिषेकाच्या वेळी त्यांना त्याच्या क्षात्र गुरुने दिली. महाराष्ट्राला तीन प्रमुख समाजसुधारकांचा वैचारिक वारसा लाभला असल्यामुळे या राज्यास फुले-शाहू-आंबेडकरांचा महाराष्ट्र असे म्हणतात. राजघराण्यातील ब्राह्मण पुरोहितांनी वैदिक स्तोत्रानुसार ब्राह्मणेतरांचे संस्कार करण्यास नकार दिल्याने शाहूंनी आर्य समाज आणि सत्यशोधक समाजाला पाठिंबा देण्याबरोबरच मराठा समाजाच्या हक्कांसाठी प्रचार केला. त्यांनी पुजाऱ्यांना हटवून क्षात्रजगद्गुरू (क्षत्रियांचे विश्व गुरू) ही पदवी देऊन एका तरुण मराठाची ब्राह्मणेतरांचे धर्मगुरू म्हणून नियुक्ती करण्याचे धाडसी पाऊल उचलले. याला वेदोक्त वाद म्हणून ओळखले जाते. ते लवकरच ब्राह्मणेतर चळवळीचे नेते बनले आणि मराठ्यांना त्यांच्या झेंड्याखाली एकत्र केले

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी १८९४ मध्ये संस्थानचा राज्यकारभार स्वीकारला. राज्यभर फिरून लोकांची परिस्थिती, गरजा व त्यांची दुःखे जाणून घेतली. सामान्य जनतेच्या भावना ओळखून त्यांचे दुःख निवारण करण्याचे काम त्यांनी आयुष्यभर केले. अज्ञान, अंधश्रद्धा नि अस्पृश्यता या तीन व्याधी निपटून काढल्याखेरीज आपल्या प्रजेच्या विकासाच्या वाटा खुल्या होणार नाहीत, याची खूणगाठ बांधून महाराजांनी कामाला सुरुवात केली. गावोगावी शाळा काढल्या, प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले, पुरोहित शाळा सुरू केल्या. त्याकाळी अस्पृश्यांना विद्येचा अधिकार तर नव्हताच; पण देवालये, चावड्या, सार्वजनिक पाणवठे आदी ठिकाणीही प्रवेश करण्यास त्यांना मनाई होती. महाराजांनी अस्पृश्यता दूर करण्याचा प्रयत्न स्वतःपासून केला. अस्पृश्य तरुणांना मोटार ड्रायव्हिंगच्या कोर्सला पाठवून आपल्या, महाराणी साहेबांच्या, चिरंजीव आक्कासाहेब व युवराज यांच्या गाडीवर नेमले. पट्टेवाले, शिपाई, डगलेवाले पोलीस, स्वतःचे शरीर-रक्षक अस्पृश्य नेमले. थोडेसे शिक्षण झालेल्यांना त्या मानाने कारकून, रजिस्ट्रारच्या जागा दिल्या. महात्मा फुले यांचा अस्पृश्योद्धाराचा विचार शाहू महाराजांनी प्रत्यक्षात उतरविला.

खुद्द महाराजांच्या राजवाड्यातही ही सुधारणा अप्रिय वाटत होती. आपल्या राजवाड्यातील खासगी देवालयातील ब्राह्मण पुजाऱ्यास महाराजांनी काढून टाकले. पूजा-अर्चा, धार्मिक विधी प्रत्येक ठिकाणी मराठा पुरोहितांकडून चालू केले. राजवाड्यातही सर्वांना मराठा पुरोहितांकडून विधी करवून घ्यावेत, अशी सूचना केली. दुष्काळी कामे, तगाईवाटप, स्वस्त धान्यदुकाने, निराधार आश्रमाची स्थापना हे कार्य पाहता 'असा राजा होणे नाही' असेच प्रजेला वाटते.शाहू छत्रपती स्पिनिंग अँड वीव्हिंग मिल, शाहुपुरी व्यापारपेठ, शेतकऱ्यांची सहकारी संस्था, शेतकी तंत्रज्ञानाच्या संशोधनासाठी 'किंग एडवर्ड अॅग्रिकल्चरल इन्स्टिटच्यूट' इत्यादी संस्था कोल्हापुरात स्थापण्यात त्यांचा प्रमुख वाटा होता. राधानगरी धरणाची उभारणी, शेतकऱ्यांना कर्जे उपलब्ध करून देणे अशा उपक्रमांतूनही त्यांनी कृषिविकासाकडे लक्ष पुरवले. राजर्षी शाहूंनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना त्यांच्या शिक्षणासाठी, तसेच मूकनायक वृत्तपत्रासाठीही सहकार्य केले होते. त्यांनी चित्रकार आबालाल रहिमान यांच्यासारख्या कलावंतांना राजाश्रय देऊन प्रोत्साहन दिले. शाहू महाराजांना 'राजर्षी' ही उपाधी कानपूरच्या कुर्मी क्षत्रिय समाजाने दिली. स्वातंत्र्यापूर्वी कैक वर्षे आधी समता, बंधुता, धर्मनिरपेक्षता, सर्व घटकांना विकासाची समान संधी ही तत्त्वे शाहू महाराजांनी करवीर संस्थानात अमलात आणली. म्हणूनच त्यांचा देशभरात 'महाराजांचे महाराज' असा गौरव होतो. रयत प्रजा व उपेक्षित समाजाला त्यांचे हक्क व न्याय मिळवून देण्याचे कार्य शाहूंनी केले आपल्या संपूर्ण जीवन कार्यामध्ये त्यांनी समाजातील बहुजन समाजाला त्यांचे न्याय व हक्क मिळवून देण्यासाठी आपल्या अधिकाराचा पूर्णपणे वापर केला म्हणूनच ते लोककल्याणकारी राज्यकर्ते ठरले. त्यांच्या कार्याचा गौरव समकालीन लेखकांनी व इतिहासकारांनी केलेला आहे.

अस्पृश्यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा करण्याच्या उद्देशाने शाहू महाराजांनी अस्पृश्यांना स्वावलंबी बनवण्याचे ठरवले. त्यासाठी अस्पृश्यांना स्वतंत्र व्यवसाय करण्यास प्रोत्साहन दिले, दुकाने हॉटेल्स काढण्यासाठी प्रोत्साहन दिले, तसेच आर्थिक मदत देखील देऊ केली. अस्पृश्यांना शिवण यंत्रे देऊन स्वतंत्र व्यवसाय करण्यास प्रोत्साहन दिले राजवाड्यातील कपडे त्यांच्याकडून शिवून घेण्यास सुरुवात केली गंगाधर कांबळे या व्यक्तीला कोल्हापुरात मध्य वस्तीत चहाचे दुकान काढून दिले अस्पृश्यांना समाजात प्रतिष्ठा प्राप्त व्हावी म्हणून त्यांनी महार पैलवानांना पैलवान चांभार यांना सरदार अभंग यांना पंडित अशा पदव्या दिल्या अस्पृश्य सुशिक्षित तरुणांची तलाठी म्हणून नेमणूक केली. अस्पृश्यता नष्ट करण्याच्या दृष्टीने त्यांनी सवर्ण व अस्पृश्यांच्या वेगळ्या शाळा भरवण्याची पद्धत १९१९ मध्ये बंद केली. गावच्या पाटलाने कारभार चांगला चालवावा यासाठी शिक्षण देणाऱ्या पाटील शाळा, प्रत्यक्ष व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या, तंत्रे व कौशल्ये शिकवणाऱ्या शाळा असेही उपक्रम त्यांनी राबवले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचा व कार्याचा वारसा समर्थपणे चालवणारा राजा म्हणून आपली ओळख निर्माण केली. सामाजिक बंधुभाव, समता, दलित व उपेक्षित बांधवांचा उद्धार, शिक्षण, शेती, उद्योगधंदे, कला, क्रीडा व आरोग्य इत्यादी महत्त्वपूर्ण क्षेत्रामध्ये अद्वितीय स्वरूपाचे कार्य केले.



प्रविण बागडे
नागपूर
९९२३६२०९१९

त्या काळात अस्पृश्य मानल्या गेलेल्या जातीच्या लोकांसाठी नोकरीमध्ये राखीव जागांची तरतूद करून सरकारी नोकऱ्या मिळवून दिल्या. शाळा, दवाखाने, पाणवठे, सार्वजनिक विहिरी, सार्वजनिक इमारती इत्यादी ठिकाणी (तत्कालीन) अस्पृश्यांना समानतेने वागवावे असा आदेश त्यांनी कोल्हापूर संस्थानात काढला. १९१७ साली त्यांनी पुनर्विवाहाचा कायदा करून विधवाविवाहाला कायदेशीर मान्यता मिळवून दिली. तसेच त्यांनी देवदासी प्रथा बंद करण्यासाठीही कायद्याची निर्मिती केली. बहुजन समाजाला राजकीय निर्णयप्रक्रियेत सामावून घेण्यासाठी त्यांनी १९१६ साली निपाणी येथे 'डेक्कन रयत असोसिएशन' ही संस्था स्थापली. तत्कालीन परिस्थितीमध्ये जातिव्यवस्थेची शिकार झालेल्या अनेक जमाती त्या काळात चोऱ्या, दरोडे अशा चुकीच्या मार्गांचा अवलंब करत होत्या. सनातनी वर्णव्यवस्थेने त्यांना उपेक्षित ठेवून शिक्षण, सत्ता व संपत्तीचा अधिकार नाकारला, त्यामुळे त्यांचे जीवन नैराश्यमय झाले. त्याचाच परिणाम म्हणून त्यांनी चोऱ्या, दरोड्यांचा मार्ग अवलंबला. त्यामुळे ब्रिटिश सरकारने या जमातीवर गुन्हेगारीचा शिक्का मारला. त्यांना रोज गावकामगाराकडे हजेरी लावावी लागत असे. शाहू राजांना या लोकांविषयी कणव होती. कारण ते खऱ्या अर्थाने वंचितांचे राजे होते. त्यामुळे शाहूंनी हजेरी पद्धत बंद केली. या जाती जमातींच्या लोकांना एकत्रित करून गुन्हेगारीपासून त्यांना परावृत्त केले. त्यांना संस्थानात नोकऱ्या दिल्या. त्यांच्यातून पहारेकरी, रखवालदार, रथाचे सारथी निर्माण केले. त्यांना घरे बांधून दिली. वणवण भटकणाऱ्या लोकांच्या राहण्याची सोय झाली. पोटापाण्याची सोय झाली. त्यामुळे गुन्हेगार म्हणून शिक्का बसलेल्या लोकांना माणूस म्हणून समाजात सन्मानाने वावरता येऊ लागले.

गुन्हेगारांना शासन करणारा सत्ताधीश सर्वत्र पहायला मिळेल. मात्र त्यांना प्रेमाने, मायेने आपलेसे करून समाजात सामाजिक दर्जा देणारा व त्यांच्यात स्वाभिमान निर्माण करणारा राजा विरळाच. वेदोक्त मंत्र म्हणण्याच्या अधिकारावरून झालेला वेदोक्त संघर्ष राजर्षी शाहूंच्याच काळात झाला. हे महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनातील वादळच होते. या प्रकरणामुळे सत्यशोधक चळवळ आणखी प्रेरित झाली. बहुजन, अस्पृश्य समाजाचा सर्वांगीण विकास साधण्याचे कार्य करताना त्यांनी एका अर्थाने महात्मा फुले यांचीच परंपरा पुढे चालवली. त्यांनी सत्यशोधक चळवळीला प्रत्यक्ष सहकार्य केले. कोल्हापूर संस्थानांमध्ये सत्यशोधक चळवळीचा प्रसार आणि प्रचार करण्याचे ही महत्त्वाची जबाबदारी राजर्षी शाहू महाराजांनी पार पडली त्यांच्या नेतृत्वाखालीच संपूर्ण कोल्हापूर संस्थानांमध्ये सत्यशोधक चळवळ उभी राहिली आणि ती नेटाने पुढे नेण्याची कामगिरी देखील पार पाडली गेली. पुढे या चळवळीचा प्रसार आणि प्रचार करण्याची महत्त्वाची जबाबदारी कर्मवीर भाऊराव पाटील यांनी पार पाडली यासाठी त्यांनी शिक्षणातून बहुजन समाजाचा सर्वांगीण विकास हे सूत्र अंगिकारले. दलित पीडित उपेक्षित समाजाला न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला यामागे खरी प्रेरणा ही राजर्षी शाहू, महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची होते. बाबासाहेब आंबेडकरांना माणगावच्या परिषदेमध्ये दलितांचा नेता व भारतीय अग्रणी नेता म्हणून घोषित केले. यापुढील काळामध्ये बाबासाहेबांनी दलित उपेक्षित समाजाचे नेतृत्व करावं असे आवाहनही महाराजांनी केले. शाहू यांनी सर्व उपेक्षित समाजातील व अस्पृश्य वर्गातील लोकांना आपल्या संस्थानामध्ये आरक्षणाद्वारे नोकऱ्या देण्याचा प्रयत्न केला यादृष्टीने संपूर्ण भारतामध्ये आरक्षणाचे जनक म्हणून त्यांचा गौरव केला जातो. सामाजिक न्यायाची भूमिका घेऊन शाहूराजांनी सामाजिक समतेसाठी प्रयत्न केले. कुशाग्र बुध्दिमत्ता, प्रभावित करणारं व्यक्तिमत्व, कलेविषयी अगाध प्रेम, थोर समाज सुधारक, बहुजन समाजाचा उध्दारकर्ता, कुशल प्रशासक, स्वच्छ प्रतिमा असलेला राज्यकर्ता म्हणुन कोल्हापूर संस्थानांचे राजर्षी छत्रपती शाहु महाराज यांनी दैदिप्यमान राज्य कारभार केला. ज्यांच्या सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक कर्तृत्वाची नोंद घेवूनच देशभर त्यांची १५० वी जयंती साजरी होत आहे, त्या निमित्त त्यांना विनम्र अभिवादन !

# अनेक टोपणनावाने जगप्रसिद्ध: मायकेल जॅक्सन!

मृत्यूपश्चात देखील मायकेल जॅक्सनच्या ध्वनिफितींची विक्री, शिफारशी आणि मैफलींतून त्यांना मिळणारे वार्षिक मानधन सन १९८९मध्ये सुमारे १२५ दशलक्ष डॉलर्स होते. ऑगस्ट २०१८मध्ये फोर्ब्स मासिकाच्या यादीनुसार त्यांची एकूण कमाई ४.२ अब्ज डॉलर्स झाली होती. सन २०१६मध्ये जॅक्सन इस्टेटकडून वार्षिक एकूण कमाईची अंदाजे किंमत ८२५ दशलक्ष डॉलर्स इतकी होती, त्यामुळे सन २०१९मध्ये फोर्ब्सने जॅक्सनना सन २०१२ वगळता प्रत्येक वर्षी जगातील अव्वल कमाई करणारा मृत कलाकार म्हणून मान्यता दिली. सदर माहितीपूर्ण लेख श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी प्रस्तुत करताहेत... संपादक.

मायकल जॅक्सन हे एक जगप्रसिद्ध अमेरिकन पॉप गायक, गीतकार आणि नर्तक. किंग ऑफ पॉप याबरोबरच द ग्लोव्ह वन, वॉको जॅको, एमजे, जॅको, मिकी माईक, ऍपलहेड, स्मिली अशा अनेक टोपणनावानेही ते प्रसिद्ध होते. त्यांचा जन्म अमेरिकेतील शिकागोजवळील इंडियाना येथील गॅरी या गावात झाला. जॅक्सन स्ट्रीटवर एका श्रमिक वर्गातील आफ्रिकन-अमेरिकन कुटुंबामध्ये जन्मलेले मायकल हे जॅक्सन कुटुंबातील दहा मुलांपैकी आठवे मुलगे होते. त्यांना रेबी, लातोया आणि जेनेट या तीन बहिणी आणि जॅकी, टीटो, जर्माइन, मार्लन आणि रँडी हे पाच भाऊ. त्यांची आई कॅथरीन एस्तेर जॅक्सन या क्लॅरिनेट आणि पियानो वाजवत असत. त्यांचे वडील जोसेफ हे निवृत्त मुष्टियोद्धा होते. चरितार्थाकरिता ते क्रेन ऑपरेटरचे काम करीत. तसेच स्थानिक रिदम अँड ब्लूज बँडमध्ये गिटार वाजवित असत. जोसेफ आणि त्यांचे भाऊ ल्यूथर यांनी इतर सहकाऱ्यांसमवेत द फॅल्कन्स नावाचा बँड काढला. काही कालावधीनंतर तो बंद पडला; पण त्यांच्या गाण्याच्या तालमींमुळे या मुलांच्या मनात गायन, वादन यांबद्दल आकर्षण निर्माण झाले व त्यांचे संगीताचे उपजत कलागुण हळूहळू वाढीस लागले. त्यांच्या आईवडिलांनी त्यांना घरीच संगीताचे शिक्षण द्यायला सुरुवात केली. त्यांच्या वडिलांनी या भावंडांना गायन, नृत्य, प्रत्यक्ष रंगमंचावर कसे वावरावे, सादरीकरण कसे करावे यांचे प्रशिक्षण दिले; पण याचबरोबर या सर्व भावंडांचे बालपण त्यांच्या वडिलांच्या विक्षिप्त स्वभावामुळे अतिशय खडतर परिस्थितीतही गेले. यामुळे बहुतांशी मुलांचा स्वभाव विशेषत: मायकल यांचा स्वभाव काही प्रमाणात मनस्वी बनला. दि.२९ ऑगस्ट १९५८ रोजी शिकागो नजीक एका लहानश्या गावात मायकल जैक्सनचा जन्म झाला. आफ्रिकन-अमेरिकन कामगारवर्गाच्या कुटुंबात जन्मलेला तो जोसेफ वॉल्टर-जो जॅक्सन आणि कॅथरीन एथर स्क्रूज यांचा दहा मुलांपैकी आठवा होता. त्यांचे वडील स्टील गिरणी कामगार म्हणून काम करत असत, त्याची आई एक प्रामाणिक यहोवाची साक्षीदार होती. केथरीन या मायकलच्या आईला संगीताची फार आवड होती, मायकलला संगीताच्या आवडीचे बाळकडू हे घरातूनच मिळत गेले. अगदी लहानपणापासूनच ते संगीतप्रेमी होते. वडिलांच्या मार्गदर्शनाखाली मायकल आणि त्यांची चार भावंडे मिळून जॅक्सन ब्रदर्स या नावाने संगीताचे कार्यक्रम करीत होती. त्यावेळी मायकल १० वर्षांचे होते. तत्कालीन तरुणांना आकर्षक वाटणारी दिलखेचक वेशभूषा आणि वेगळी केशभूषा- अफ्रोस- केसांची डोक्यावर गुच्छासारखी असणारी रचना, त्वेषाने आणि वेगवान हालचालींनी भरलेले नृत्य या वैशिष्ट्यांसह तरुण आणि उत्साही मंडळींनी भरलेला असा हा समूह अल्पावधीतच खूप यशस्वी झाला. पुढे त्यांच्या बँडचे नामकरण जॅक्सन-५ असे करण्यात आले. ऑगस्ट १९६७मध्ये हार्लेम येथील सुप्रसिद्ध अपोलो थिएटरमध्ये त्यांना कार्यक्रम करण्याची संधी मिळाली. तेथील अमॅच्युअर शो या कार्यक्रमात भाग घेण्यास मिळणे, ही कलाकारांसाठी एक पर्वणी असायची. तेथील कार्यक्रमामुळे या बंधूंनाही प्रसिद्ध कलाकार म्हणून मान्यता मिळाली. स्टीलटाउन या संस्थेच्या नावाखाली पहिल्यांदा या बँडची बिग बॉय बॅक्ड विथ यू हॅव चेंज आणि वी डोन्ट हॅव टू बी ओव्हर २१ टू फॉल इन लव्ह, बॅक्ड विथ जॅम सेशन ही दोन गाणी ध्वनिमुद्रित झाली. यानंतर काही कालावधीतच अमेरिकेतील एक प्रसिद्ध ध्वनिमुद्रिका संस्था मोटाऊन रेकॉर्ड्स या संस्थेचे अध्यक्ष ज्युनिअर बेरी गॉर्डी यांनी



या बँडबरोबर मोठ्या रकमेचा करार केला- १९६८. या संस्थेबरोबर जॅक्सन-५ यांनी आय वाँट यू बॅक, एबीसी, द लव्ह यू सेव्ह, आय विल बी देअर, ममाज पर्ल, नेव्हर कॅन से गुडबाय, मेबी टुमॉरो या अत्यंत यशस्वी ध्वनिमुद्रिका केल्या. आय वाँट यू बॅक हे या संस्थेबरोबरचे त्यांचे पहिलेच गाणे अतिशय लोकप्रिय झाले. अमेरिकेतील बिलबोर्ड्स टॉप १००-अमेरिकेतील सर्वांत लोकप्रिय ध्वनिमुद्रिका आणि गीतांची क्रमवारी प्रसिद्ध करणारे मान्यताप्राप्त साप्ताहिक या संगीत मानांकनात हे गाणे पहिल्या क्रमांकावर गेले. अमेरिकेत या गाण्याच्या संग्रहाच्या जवळपास वीस लक्ष आणि अमेरिकेबाहेर चार लक्ष प्रतींची तडाखेबंद विक्री झाली. पुढच्या एबीसी या संग्रहाच्या बावीस लक्ष प्रतींची विक्री झाली.मायकल जॅक्सन त्यांच्या नवीन कार्यक्रमाच्या तयारीत असताना त्यांना जोरात हृदयविकाराचा झटका आला. वयाच्या ५० व्या वर्षी अमरिकेतील कॅलिफोर्निया येथे हृदयक्रिया बंद पडल्यामुळे त्यांचा मृत्यू झाला. अतिरिक्त औषधांच्या सेवनामुळेही त्यांना हृदयविकाराचा झटका आला असावा, असे निदान करण्यात आले होते. मायकल जॅक्सन यांच्या जीवनावर आधारित विविध चित्रपट आणि माहितीपट तयार करण्यात आले आहेत. यामध्ये द विझ-१९७८, मायकल जॅक्सन थ्रिलर-१९८३, मेकिंग ऑफ मायकल-१९८३, मायकल जॅक्सन द लिजेंट-१९८८, कॅप्टन इ ओ-१९८६, मायकल जॅक्सन वन नाईट-१९९५, मायकल जॅक्सन नंबर वन्स-२००३, मिस कास्ट अवे आणि द आयलँड गर्ल्स-२००४, द वन-२००४, मायकल जॅक्सन अनमास्क्ड-२००९, मायकल जॅक्सन दिस इज इट-२००९, मायकल जॅक्सन व्हिजन-२०१०, बॅड २५-२०१२, मायकल जॅक्सन द लास्ट फोटो शूट-२०१४ इत्यादींचा समावेश आहे. जगाला विद्युत शॉक देणारा दिवस म्हणजे दि.२५ जून २००९ रोजी लॉस एंजेलिस येथे दुपारी २:२६ वा. अचानक दूरचित्र वाहिन्यांवर वृत्त झळकायला लागलं. मायकेल जॅक्सन यांचं निधन!.. अनेकांसाठी तो खूप मोठा धक्का होता. या धक्क्यानं अमेरिकेत अनेक लोक रस्त्यावरच बेशुद्ध पडले. काही मिनिटांतच सोशल मीडिया वेबसाईट्स क्रॅश झाल्या. नैराश्यात गेल्यानं १३ जणांनी आत्महत्या केली! सुसाईड प्रिव्हेन्शन हॉटलाइनवरही जगभरात शेकडो कॉल आले. हॉटलाइनवर असलेल्या तज्ज्ञांनी त्यांना कसंबसं आत्महत्येपासून परावृत्त केलं. त्यांच्याभोवती असलेलं प्रसिद्धीचं आणि गूढतेचं वलय त्याच्या मृत्यूनंतरही कायम होतं. ज्या दिवशी त्याचा मृत्यू झाला, तो दिवस तर त्याचे चाहते आजही विसरलेले नाहीत.!! या लेखप्रपंचातून पॉप गायक मायकेल जॅक्सन यांना स्मृतिदिनानिमित्त करोडो विनम्र अभिवादन !!

# छत्रपती संभाजी नगर मध्ये विभागीय आयसीटी संगणक प्रयोगशाळा व्यवस्थापन व मार्गदर्शन कार्यशाळा संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

आष्टी । अण्णासाहेब साबळे

महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेच्या वतीने समग्र शिक्षा अभियान अंतर्गत छत्रपती संभाजी नगर (औरंगाबाद )विभागातील संगणक प्रशिक्षक कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी छत्रपती संभाजी नगर औरंगाबाद येथील मौलाना आझाद रिसर्च सेंटर हॉलमध्ये विभागीय आयसीटी प्रशिक्षकांसाठी या वर्षातील दुसरी,व या सत्रातली पहिली आयसीटी संगणक प्रयोगशाळा व्यवस्थापन व मार्गदर्शन कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.या कार्यशाळेसाठी प्रकल्प व्यवस्थापक हिना कौसर उपस्थित होत्या तसेच



सौ.वैशाली मिसाळ यांनी सर्व संगणक प्रशिक्षकांना प्रशिक्षण दिले या प्रशिक्षण उपक्रमामुळे शालेय विद्यार्थ्यांना संगणक साक्षरता,डिजिटल साक्षरता बद्दल ज्ञान मिळत आहे.दैनंदिन जीवनातील विविध समस्या सोडवण्यासाठी संगणकाचा वापर कसा करता येईल तांत्रिक शिक्षणाशिवाय कोणताही देश प्रगती करू शकत नाही त्यात संगणक महत्त्वाची भूमिका बजवीत आहे.शिक्षण क्षेत्रात अध्यापन अध्ययनासाठी देखील संगणकाचा एक उपयुक्त शैक्षणिक साधन म्हणून वापर केला जातो. संगणक शिक्षणामुळे शाळेतील शैक्षणिक प्रशासकीय सेवेत सहजता येते.संगणक शिक्षणामुळे शाळेतील कामे संगणकाच्या साह्याने लवकर व अचूक करण्यास मदत होते. शालेय आरोग्य तपासणी संबंधित माहिती साठवून त्याचा पाठपुरावा करण्यासाठी सुद्धा माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाची खूप मदत होते.याची माहिती दि.१९ जून २०२४ ला छत्रपती संभाजी नगर (औरंगाबाद)येथे आयोजित संगणक प्रशिक्षकांचे प्रशिक्षण कार्यशाळेमध्ये देण्यात आली.या कार्यशाळेसाठी औरंगाबाद(छत्रपती संभाजी नगर) विभागातील ३०० प्रशिक्षक उपस्थित होते.या कार्यशाळेचे सर्व नियोजन विभागीय व्यवस्थापक व सर्व जिल्हा समन्वयक यांनी केले.

# कंधार तालुक्यात खरीप हंगामाची पेरणी ७६.०२ टक्के पूर्ण

## मन्याड खोऱ्यातील बळीराजा पावसांच्या प्रतीक्षेत

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**

शेतकऱ्यांच्या आणि शेतीच्या आयुष्यातील महत्वाचे दिवस म्हणजे पेरणीचा काळ, लगीन घरात जशी लगीनघाई असते तशीच लगबग शेतकऱ्यांना पेरणी काळात असते,कंधार तालुक्यात खरीप हंगामातील ७६.०२ टक्के पेरणी पूर्ण केली आहे.चाड्यावरू मूठ धरून विठू माउली,संत तुकाराम महाराज,संत ज्ञानेश्वर माऊलीचे अभंग,ओव्या गात काळ्या आईची ओटी करण्यास अनेकांनी सुरुवात केली आहे.दुपारनंतर नियमितपणे आभाळ भरून येत आहे,आकाशात ढग जमा होतात, वादळ वारा येतो आणि ढग निघून जातात.बळीराजा आकाशाकडे पाऊस पडण्याच्या अपेक्षेने बघतच राहतो,मात्र पाऊस पडतच नाही.पावसानेही दडी मारली आहे आणि उन्हाळ्यासारखे उनही पडत असल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे.

यंदा मृग नक्षत्रामध्ये चांगला पाऊस पडेल असा अंदाज हवामान खात्याने वर्तविला होता.मात्र तो तालुक्यात खोटा ठरला आहे. पावसाने हुलकावणी दिली आहे. त्यामुळे खरीप हंगामाचे समीकरण बदलले जाण्याची शक्यता,

यावेळी खरीप हंगामात सोयाबीन ऐवजी कापूस, हाळद,उडीद पीक लागवडीसाठी शेतकरी प्राधान्य देत आहेत. कंधार तालुक्यात माळरान अधिक आहे.शेती आहे.सिंचन प्रमाण अत्यल्प असल्याने एकच हंगाम अधिक प्रमाणात घेतला जातो. हलकी भुसभुशीत जमीन त्यात दगड, गोटे अधिक आणि मातीआहे. कंधार तालुक्यात ६५ हजार ४३१ हेक्टर क्षेत्र जमीन लागवडी लायक आहे. तसेच दि.२५ जूनपर्यंत ४९७४६ पेरणी झाली असून ७६.०२ टक्के तालुक्यात पेरणी झाली आहे.

जमिनीत पुरेशी ओल नसताना शेतकरी बांधवांनी



पेरणीची मोठी जोखीम स्वीकारली आहे.शेत शिवारात पेरणीसाठी मोठी गर्दी दिसून येत होती,
तालुक्यात ७६ तक्के पेरणी पूर्ण झाली आहे.पण पावसाने ओढ न दिल्याने सर्वांच्याच तोंडचे पाणी पळाले आहे. जूनमध्ये पहिल्या आठवड्यात केलेल्या पेरणीचे पीक उगवले असून मोड मोठे झाले आहेत. पण तिसऱ्या आठवड्यात पेरणी केलेल्या शेतकऱ्यांची काळजात धडकी भरली आहे. तीन दिवसांपासून कडक उन पडले आहे.

अंगाची लाहीलाही होत आहे. पावसाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. दोन दिवसात पाऊस झाला नाही तर मात्र दुबार पेरणीचे संकट घोंगावू लागले आहे. सोयाबीन, ज्वारी, बाजरी, तूर, मूग, उडीद, सूर्यफूल, तीळ आदी पिके कोरडवाहू क्षेत्रावर घेतली जात आहेत. पेरणी नंतर अनेक भागात मोर हरीण, वानरं, पक्ष्यांनी उच्छाद माडला आहे. बियाणे खावून जात आहेत. एक तर पाऊस नाही, जमिनीत ओल नाही. त्यात पशु, पक्षी, वन्य प्राणी यांचा त्रास यामुळे शेतकरी वैतागले आहेत. महाग मोलाचे बी बियाणे, खते, औषधी खरदी करून लागवड केल्यानंतर पाऊस वेळेवर आला नसल्याने शेतकऱ्यांसह नागरिकांची चिंता वाढली आहे. पावसासाठी शेतकऱ्यांनी पांडुरंगाला साकडे घातले आहे.

# अवैध व्यवसाय व भ्रष्टाचार चव्हाट्यावर आणल्याने माझ्यावर जीवघेणा हल्ला असावा

## शेख इरफान यांनी पत्रकार परिषदेतून मांडली व्यथा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरखेड । सय्यद रहीम रजा**

उमरखेड माझ्या वाढदिवसाच्या निमित्ताने आयोजित असलेल्या एका छोटेखानी कार्यक्रमात माझ्यावर काही युवकांनी जीवघेणा हल्ला करण्याचा प्रयत्न २३ जून रविवारच्या रात्री ९:४० वाजताच्या दरम्यान केला सदर हल्ला हा मी केलेल्या अवैध रेती व्यवसाय, तांदूळ गैरव्यवहार आणि अवैध प्लॉट विक्री करणाऱ्या व्यक्तीविरुद्ध केलेल्या तक्रारीमुळे झाला असावा अशी माहिती शेख इरफान शेख इसा यांनी विश्रामगृह उमरखेड येथे पत्रकार परिषदेतून दिली. रविवार दिनांक २३ जून च्या रात्रीच्या दरम्यान नांदेड रोडवरील एम. के. कॉम्प्लेक्स समोर वाढदिवस साजरा करत असताना तेथे माझे दोन सखे भाऊ शेख मुजाहिद शेख इसा व शेख नदीम शेख इसा, भाविक भागत, अनुप शेखावत यांच्यासह माझी बरीच मित्र मंडळी हजर होती. वाढदिवस साजरा करत असताना तेथे बाजूला लहान मुलांचे भानगड सुरू असताना मी ते सोडविण्यासाठी गेलो असता तेथे हजर असलेल्या शेख मजहर शेख अलाउद्दीन



शेख अजहर शेख अल्लाउद्दीन हे अचानक आले व शिवीगाळ करून मला पकडू लागले. त्यांच्याजवळ असलेल्या चाकूने माझ्या डोक्यावर डाव्या बाजूला मारून जखमी केले तसेच आरिष खतीब यांनी मला लाथा बुक्क्याने मारहाण करून जीवाने मारण्याची धमकी दिली. वरील तीनही आरोपींनी लहान मुलांचे भानगड सोडवण्यासाठी का आला या कारणावरून वाद करून मला चाकू मारून जखमी केले. सदर आरोपी हे गुंड प्रवृत्तीचे असून ते कधी काय करतील याचा नेम नाही. अशी तक्रार मी पोलिसांमध्ये दिली आहे. त्यांच्यावर कार्यवाही करून पत्रकार संरक्षण कायद्या अंतर्गत गुन्हे नोंद करण्यात यावे व कलम ३०७ चा गुन्हा सुद्धा दाखल करण्यात यावा अशी आपण पोलीस प्रशासनाला विनंती केली असल्याची माहिती पा. उमरखेड वातार्चे संपादक शेख इरफान शेख इसा यांनी पत्रकार परिषदेमधून दिली.

**उमरखेड शहरात कायदा आणि सुव्यवस्थेचा बट्ट्याबोळ – शिवाजी माने**

अलीकडच्या काळात उमरखेड शहरात गुन्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे कायदा आणि सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी पोलिसांची आहे उमरखेड शहरात कायद्याचा पुरता बदूयाबोळ झाला. अवैद्य लेआउट करून प्लॉट विक्री करणाऱ्या वर शेख इरफान यांनी तक्रार दाखल केली, सदर प्रकरणावर तहसील प्रशासनाकडून अवैध प्लॉट विक्री करणाऱ्यावर पाच कोटी रुपयांचा दंड झाला. यामधून हा प्रकार घडला असावा किंवा त्याचा वचपा काढण्यासाठी सुद्धा झाला असावा याबाबत पोलीस प्रशासनाने तपास करणे गरजेचे आहे. यासोबतच नगरपरिषद अंतर्गत असलेल्या एका शाळेत तांदूळ अपरातफर संदर्भात सुद्धा तक्रार दाखल केली. अवैध रेती वाहतूक मोठ्या प्रमाणात सुरू असून या प्रकरणांमधून नायब तहसीलदार यांच्यावर सुद्धा चाकू हल्ला केला होता. त्यांच्याकडून सुद्धा सदर हल्ल्याचा प्रकार घडला असावा अशी शंका शिवाजी माने यांनी व्यक्त केली. या तीनही घटनेच्या प्रकरणावरून झालेल्या हा हल्ला आहे का? याचा शोध घेऊन पोलिसांनी तपास करावा तसेच पोलिसांनी पत्रकार संरक्षण कायद्यानुसार गुन्हा दाखल करून ३०७ चा गुन्हा सुद्धा नोंद करून प्रकरणाचा तपास करावा अशी विनंती शिवाजी माने यांनी पत्रकार परिषदेमधून केली.

# कर वाढ रद्द करा उमरखेडकरांची नगरपालिकेवर धडक

## पुरोगामी युवा ब्रिगेडचा पुढाकार



नागरिकांना विश्वासात न घेता अन्यायकारक मालमत्ता कर वाढ चुकीची आहे. मुळात शहरात मूलभूत सोयी सुविधा उपलब्ध नसताना करवाढ कशाला ? जी जुनी कर आकारणी आहे तीच कायम ठेवून आधी शाळा, रस्ते, नाली , स्वच्छता आदि मुलभूत सुधारणे कडे नगरपालिकेने लक्ष द्यावे

**शाहरूख पठाण,प्रवक्ता,पुरोगामी युवा ब्रिगेड**

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरखेड । सय्यद रहीम रजा**

उमरखेड नवीन मालमत्ता कर आकारणी रद्द करून जुनीच कर आकारणी पद्धत सुरु ठेवा या प्रमुख मागणीसाठी उमरखेडकरांनी पुरोगामी युवा ब्रिगेड च्या पुढाकारातून नगर पालिकेवर धडक देत निवेदन दिले.

नगरपालिका उमरखेड ने चालू वर्षात नुकतीच मोठ्या प्रमाणात कर वाढ आकारणी सुरू केली असून सदर कर आकारणी संबंधित नागरिकांच्या अनेक तक्रारी आहेत . अनेक नागरिकांचा यावर रोष आहे. आरोग्य, शिक्षण आदी विषयांवरदेखील मोठ्या प्रमाणात कर वाढ केली आहे. या अन्यायकारक कर आकारणी रद्द व्हावी यासाठी उमरखेडकरांनी मोठ्या प्रमाणात गर्दी करत उमरखेड नगरपालिकेवर धडक दिली व मुख्याधिकारी यांना निवेदन दिले. यावेळी अनेक सामजिक संघटनेचे पदाधिकारी, प्रतिष्ठित नागरिक, व्यापारी, युवा, महीला व शेतकरी उपस्थित होते.

सदर मोर्चा यशस्वी व्हावा यासाठी पुरोगामी चे जिल्हाध्यक्ष शिवशंकर सुरोशे, भागवत सूर्यवंशी, जाकिर राज, सिद्धार्थ मुनेश्र्वर, अनिल हरणे, गजानन गायकवाड, नवनाथ जाधव, हिरांसिंह जाधव, आकाश लोमटे, योगानंद जाधव, राजेश वाढे, अंबादास गव्हाळे, मनोज धूळध्वज, नागराज दिवेकर, मुक्तार शाह, दत्ता दिवेकर, ताहेर शाह, महेश अन्नछत्रे, प्रवीण बारापत्रे, सिराज खान, संदिप मवाडे, अजय शेळके , माजीद पठाण पुरोगामी युवा ब्रिगेड च्या सर्व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. खालील पक्ष व सामजिक संघटनांचा होता पाठींबा प्रहार, भीम टायगर सेना, रिपब्लिकन पक्ष, राष्ट्रवादी अजित पवार ,राष्ट्रवादी युवक आघाडी शरद पवार शिवसेना ठाकरे गट बळीराजा पक्ष, शेतकरी कष्टकरी संघ आदींनी पाठींबा दिला .

# रिलायन्स मॉल जवळील अनाधिकृत खानावळीचे अतिक्रमण जमीनदोस्त

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

महानगरपालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने गारखेडा परिसरातील रिलायंस मॉल जवळील अनाधिकृत खानावळीचे चे अतिक्रमण आज जमीनदोस्त करण्यात आले.

रिलायन्स मॉल गारखेडा येथे महानगरपालिकेच्या जागेवर अतिक्रमण करून बांधलेले खानावळ चे बांधकाम आज पाडण्यात आले आहे. शेख अखिल यांनी वरील नमूद जागेवर चार वर्षांपूर्वी रसवंतीचा तात्पुरता परवाना घेऊन येथे २५ फूट बाय २५ फूट आकाराचा तात्पुरता लोखंडी पाईप व पत्र्यामध्ये बांधकाम करून खानावळ चालू केली होती वरील अतिक्रमणित बांधकाम हे गारखेडा कडे जाणारा मुख्य रस्ता व पुंडलिक नगर रस्त्याचे कोपऱ्यावर असल्याने स्थानिक नागरिकांना पादचारी करिता त्रास होऊन वाहतूक नेहमी ठप्प होत होती. त्या अनुषंगाने अतिक्रमण धारकास अनेकदा वरिष्ठांनी ताकीद दिली असता या कडे दुर्लक्ष केल्याने आज अतिक्रमण विभागातर्फे मा.आयुक्त तथा प्रशासक जी श्रीकांत यांच्या आदेशानुसार अतिरिक्त ०२ संतोष वाहुळे यांच्या मार्गदर्शनाखाली उपायुक्त १ सविता सोनवणे ,इमारत निरीक्षक मजहर अली व सागर श्रेष्ठ,अतिक्रमण पथक यांनी कारवाई पार पाडली अशी माहिती अतिक्रमण विभागाच्या वतीने देण्यात आली आहे.



# संयुक्त पत्रकार संघ उमरखेडची निवेदनातून मागणी

## संयुक्त पत्रकार संघाचे उपाध्यक्ष पत्रकार शेख इरफान यांचेवर जीवघेणा हल्ला करणाऱ्या गुन्हेगारांवर MPDA व पत्रकार संरक्षण कायद्याअंतर्गत गुन्हे दाखल करा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरखेड । सय्यद रहीम रजा**

दिनांक २७ जून २०२४ शेख ईरफान शेख ईसा पत्रकार उमरखेड यांच्यावर झालेल्या हल्ला करून जिवे मारण्याचा प्रयत्न केल्या प्रकरणी आरोपीवर कलम ३०७ आणि कलम ११० व चझऊ- कायद्या अंतर्गत व पत्रकार सुरक्षा कायद्या अंतर्गत कारवाई करावी व आरोपीला अभय देणारे अधिकारी, ठाणेदार उमरखेड, ए.पी.आय. सरदार यांची तात्काळ बदली करण्यात यावी अन्यथा आमरण उपोषणास बसण्यात येईल असा इशारा दिला आहे.

दि.२३/०६/२०२४ रोजी वाढदिवस साजरा करून घरी जात असतांना रात्री अंदाजे ९.०० वा. चे दरम्यान आरोपी १) शेख मजहर शेख अल्लाऊद्दीन, वय अं.२५ वर्ष, २) शेख अजहर शेख अल्लाऊद्दीन, वय अं. ३० वर्ष, ३) आरिष खतीब, वय अं.२५ वर्ष व इतर साथीदार हे नांदेड रोडवरील एम. के, कॉम्प्लेक्स समोर एकत्र येवुन त्यांना रस्त्यात अडवून त्यांचे डोक्यात चाकु मारुन प्राणघातक हल्ला केला व जिवे मारण्याची धमकी दिली अशी फिर्याद पोलीस स्टेशन उमरखेडला दिली होती. परंतु त्यानुसार पोलीसांनी कारवाई केली नाही आरोपीवर कलम ३०७, ११० आणि चझऊ- व पत्रकार सुरक्षा कायद्या अंतर्गत कारवाई करावी व विशेषतः यातील आरोपी क्र. १ ते ३ यांनी यांच्यावर हल्ला करुन डोक्यात चाकु मारुन जिवे मारण्याच्या उद्देशाने हल्ला केला. यातील या आरोपीवर उमरखेड पोलीस स्टेशन अंतर्गत यापूवी अनेक गंभीर गुन्ह्याच्या नोंद असल्याने आरोपी क्र. १ ते ३ यांचेवर चझऊ- कायद्याच्या अंतर्गत सुध्दा कारवाई करावी याबाबत संयुक्त पत्रकार संघाने तक्रार देवूनही पोलीस अधिकाऱ्यांनी तशी नोंद न घेता गुन्हेगारांना वाचविण्याच्या प्रयत्नाने अभय दिलेले आहे.

या गुन्ह्यातील गुन्हेगारांना शाहरुख पठाण हे व जलील कुरेशी यांनी चिथावणी देवून प्रोत्साहीत केल्याची माहिती मिळत आहे आणि जलील कुरेशी यांचेवर



उमरखेड पोलीस स्टेशन मध्ये दंगा भडकविणे व प्रत्यक्ष सहभाग याबाबतीत गुन्हा केल्याने तशी नोंद आहे. तसेच शाहरुख पठाण हे स्वामी विवेकानंद विद्यालय, हरदडा येथे शिक्षक म्हणून कार्यरत असतांनाही तिथे व इतर परिसरात जातीयवाद निर्माण करून सामाजिक सलोखा विघडवित असल्याची तक्रार संबंधीत शाळा प्रशासनास दि. ५ मार्च २०२४ रोजी दिलेली होती असे चरित्र शाहरुख पठाण यांचे आहे. या प्रकरणातील कायदा व सुव्यवस्था मोडकळीस आणण्याचा प्रयत्न शाहरुख पठाण व जलील कुरेशी यांच्याकडून झाला असल्याने या दृष्टीने चौकशी करुन त्यांच्यावरही योग्य ती कारवाई करावी

वरील आरोपी पैकी अनेकांनी येथील कायदा व सुव्यवस्था मोडकळीस आणल्याबाबत त्यांचेवर गुन्हे नोंद आहेत. अशा गुन्हेगारांकडून शेख ईरफान शेख ईसा यांचेचर प्राणघातक हल्ला केल्याने तशी फिर्याद शेख ईरफान शेख ईसा यांनी दिली असतांना यातील आरोपीना बचावण्यासाठी पोलीस प्रशासनाकडून प्रयत्न झाला आहे आणि यातील आरोपीने स्वतःच्या अंगावर स्वतःच ईजा पोहचवून त्यांचेकडून फिर्याद घेऊन शेख ईरफान शेख ईसा यांना दबावात आणण्याचा प्रयत्न आरोपी व पोलीस प्रशासनाकडून केल्या गेला आहे.वरील आरोपीवर कलम ३०७, ११०, एमपीडीए कायदा अंतर्गत व पत्रकार सुरक्षा कायद्याअंतर्गत कार्यवाही करावी व आरोपीला अभय देणार्या ठाणेदार सोळंके व ए.पी.आय. सरदार यांचेवर बदलीची कारवाई तात्काळ करावी. अन्यथा दि. ०२/०७/२०२४ पासून महसुल कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्यात येईल. त्या अनुषंगाने उद्भवणाऱ्या सर्व परिणामाची जबाबदारी पोलीस प्रशासनाची राहील असे उपविभागीय अधिकारी उमरखेड यांना संयुक्त पत्रकार संघाचे वतीने देण्यात आलेल्या निवेदनातून म्हटले आहे यावेळी संयुक्त पत्रकार संघाचे समस्त पदाधिकारी व सभासद हजर होते.

# उदगीर बाजार समितीचे विद्यमान सभापती शिवाजीराव हुडे यांच्या सह चार संचालक अपात्र

## विरोधकांनी पेढे वाटून, आतिषबाजी करून केला जल्लोष

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उदगीर । सुनिल बस्वराज हावा**

उदगीर बाजार समितीचे सभापती शिवाजीराव हुडे यांच्या सह चार संचालका विरुद्ध येथील तिघा अर्जदारांनी महाराष्ट्र कृषी उत्पन्न बाजार समित्या ( समिती निवडणूक अधिनायम नियम अन्वये बाजार समितीचे संचालक म्हणून अपात्र करून संचालक पदावरून काढून टाकावे असा तक्रार दाखल केली होती. या प्रकरणात बुधवारी ( ता.२६ ) छत्रपती संभाजीनगरच्या सहकारी संस्था जिल्हा उपनिबंधक डॉ. मुकेश बारहाते यांनी दिलेल्या निर्णयात अपात्र ठरविले आहे.

अर्जदार झुंजार गणपतराव पाटील ( रा. वाढवणा ) , हणमंत सोपानराव शेळके (डोंगरशेळकी ) भिवाजी मोतीराम चिखले ( रा. शेल्हाळ ) यांनी ता. ८ जून २०२३ रोजी विधीज्ञमार्फत महाराष्ट्र कृषी उत्पन्न बाजार समित्या ( समिती निवडणूक ) नियम , २०१७ चे नियम अन्वये जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था लातूर यांच्याकडे तक्रारी अर्ज दाखल केला होता. त्यात बाजार समितीचे सभापती शिवाजीराव हणमंतराव हुडे , संचालक अँड.पद्माकर मनोहर उगिले ,प्रा. शामराव समर्थ डावळे , बालाजी मषणाजी देवकते , ज्ञानेश्वर विश्वंभर पाटील यांना बाजार समितीचे संचालक म्हणून अपात्र करून त्यांना संचालक पदावरून काढून टाकावे असा अर्ज दाखल केला होता.




गैरअर्जदार शामराव समर्थ डावळे यांनी राज्याचे पणन मंत्री यांच्याकडे २६ फेब्रुवारी २०२४ रोजी अर्ज दाखल करून अर्जदार यांनी दाखल केलेला अर्ज लातूर जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांचे समोर न चालवता तो अर्ज महाराष्ट्रातील कोणत्याही जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांच्याकडे स्थलांतर करण्याचे आदेश द्यावे अशी विनंती केली होती. गैरअर्जदार यांच्या अपीलानुसार पणन मंत्रालयातील कक्ष अधिकारी यांच्या आदेशानुसार सदर प्रकरणातील संबंधित सर्व संचिका व कागदपत्रे जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे वर्ग करण्यात आले होते. या प्रकरणाची छत्रपती संभाजी नगर जिल्हा उपनिबंधक कार्यालयाने अर्जदार व गैरअर्जदार यांना सुनावणी नोटीस निर्गमित करून पाच वेळा सुनावणी घेतली.

उदगीर बाजार समितीवर शेतकरी मतदार संघातून समिती सदस्यपदी निवडून आलेले शिवाजीराव हनुमंतराव हुडे हे सचिन अग्रो फुड एलएलपी या नावाचे फर्ममध्ये भागीदार आहेत. अँड.पद्माकर मनोहर उगिले हे अंगधीराज फार्मर प्रोड्यूसर कंपनीचे संचालक असून प्रक्रिया व विक्रीचा व्यवसाय करीत आहेत.प्रा. शामराव समर्थ डावळे व बालाजी मषणाजी देवकते हे दोघे शासन अनुदानित शैक्षणिक संस्थेत नोकरीस आहेत. तर ज्ञानेश्वर विश्वंभर पाटील हे पृथ्वी ज्याग्रो अँड ऍग्रो रिसर्च असोसिएशनचे संचालक आहेत. महाराष्ट्र सहकारी संस्था समिती ( समितीची निवडणूक ) नियम १० मधील तरतुदीनुसार बाजार समितीचे प्रतिवादी सभापती व अन्य चार संचालक यांचा मुख्य उत्पन्नाचा स्त्रोत शेतीपासून नसल्याने त्यांनी बाजार समिती सदस्यपदी राहण्यासाठी अपात्रता धारण करीत असल्याने वादीचा अर्ज मंजूर करण्यात येऊन प्रतिवादी शिवाजीराव हनुमंतराव हुडे , अँड.पद्माकर मनोहर उगिले , प्रा.शामराव समर्थ डावळे , बालाजी मषणाजी देवकते , ज्ञानेश्वर विश्वंभर पाटील यांना कृषी उत्पन्न बाजार समिती उदगीर संचालक पदावर कार्यरत राहण्यास अपात्र ठरवीत असल्याचा निर्णय छत्रपती संभाजी नगर सहकारी संस्थेचे जिल्हा उपनिबंधक डॉ. मुकेश बारहाते यांनी दिला आहे.

### विरोधकांनी केला जल्लोष

छत्रपती शिवाजी चौकात विरोधकांनी या निर्णयाचे स्वागत करत पेढे वाटुन फटाके फोडुन जल्लोष साजरा केला . यावेळी माजी नगरअध्यक्ष राजेश्वर निटुरे ,सिद्धेश्वर पाटील ,रामराव बिरादार ,हानमंत शेळके ,मनोज चिखले , सुभाष धनुरे ,सुरेद्र अक्कनगीरे , शाहाजी पाटील यांच्या सह अन्य कार्यकर्ते उपस्थित होते.

**उदगीर कृषी उत्पन्न बाजार समिती निवडणूकीच्या वेळी वरील अपात्र सर्व संचालक एकाच पँनल मधून निवडणूक लढवली होती.यात आज रोजी प्रा.श्याम समर्थ डावळे कँबिनेट मंत्री ना.संजय बनसोडे यांचे समर्थक आहेत.तर शिवाजी हूडे, अँड.पद्माकर उगीले हे राष्ट्रीय काँग्रेसचे नेते असून ज्ञानेश्वर पाटील हे शरदचंद्र पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आहेत.हे सर्व एकेकाळी ना.बनसोडे यांचे समर्थक होते.**

# सेनगाव तहसील कार्यालयासमोर स्वस्त धान्य दुकानदाराचे विविध मागण्यांसाठी धरणे आंदोलन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सेनगाव । महादेव हरण**

सेनगाव तहसील कार्यालयासमोर स्वस्त धान्य दुकानदाराचे विविध मागण्यांसाठी आज दिनांक २७ जून रोजी तहसील कार्यालयाच्या समोर धरणे आंदोलन सुरू केले असून यामध्ये स्वस्त धान्य दुकानदारांना राशन कार्ड मध्ये नाव कमी करणे व नाव वाढवण्याचे अधिकार देण्यात यावे यासह इतर मागण्यांसाठी स्वस्त धान्य दुकानदाराकडून धरणे आंदोलन करण्यात आले आंदोलनाची दखल न घेतल्यास २ जुलै रोजी सर्व जिल्ह्यातील जिल्हा अधिकारी कार्यालय समोर आंदोलन करू नसता ८ जुलै रोजी मुंबई येथील आझाद मैदानावर आंदोलन करू असे यावेळी आंदोलनकर्त्यांनी सांगितले.



# शासनाने शेतकऱ्याच्या आंदोलनाची दखल न घेतल्याने दुचाकी जाळून केला निषेध

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सेनगाव । महादेव हरण**

सेनगाव तालुक्यातील ताकतोडा येथे गेल्या चार दिवसापासून पीक कर्जा संदर्भात आंदोलन चालू असून या आंदोलनाची शासनाने दखल न घेतल्याने संताप व्यक्त करत शेतकरी शांताराम सावके यांनी आपली दुचाकी पेटवून शासनाचा निषेध व्यक्त केला हिंगोली जिल्ह्यांमध्ये अनेक शेतकऱ्यांनी पीक कर्ज काढले असून हे पीक कर्ज शासनाने माफ करावे या मागणीसाठी ताकतोडा येथील शेतकऱ्यांनी आंदोलन केले असून शासनाचा कोणताच कर्मचारी या आंदोलनाकडे आला नसून संतप्त आंदोलनकर्त्यांनी शासनाच्या विरोधात घोषणाबाजी केली,



# पाटोदा दिवाणी न्यायालय येथे कायदे विषयक जनजागृती शिबीर संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोदा दिवाणी न्यायालय येथे गुरुवार दिनांक २७ जून-२०२४ रोजी सकाळी १०:३० वाजता कायदेविषयक जनजागरण शिबिर आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पाटोदा दिवाणी न्यायालयाच्या न्यायाधीश श्रीमती एस.एन.निकम मॅडम होते तर प्रमुख पाहुणे म्हणून पाटोदा सहदिवाणी न्यायाधीश श्रीमती ए.ए.पाटील मॅडम व पाटोदा वकील संघाचे अध्यक्ष विधीज्ञ एस.एस.कोठेकर हे उपस्थित होते. या कायदे विषयक शिबिर प्रसंगी बालकांच्या मोफत आणि सक्तीचा शिक्षण अधिनियम- २००९ या विषयी विधिज्ञ आर.जी.औटे यांनी तर राईट ऑफ रिजनेबल रेसिडेन्स या विषयावर विधीज्ञ एस.एन.घुमरे यांनी मार्गदर्शन केले. तसेच या प्रसंगी लोकअदालत या विषयावर पाटोदा दिवाणी न्यायालयाच्या न्यायाधीश श्रीमती एस.एन.निकम मॅडम यांनी लोकन्यायालय याचे महत्त्व विशद करून लोकन्यायालयात तडजोडीने मिटलेल्या तंटा हा पक्षकारांच्या अपेक्षेप्रमाणे निकाल असतो आणि चर्चेतून अनेक वाद कायमस्वरूपी सहज मीटू शकतात व समाजात शांतता सुव्यवस्था अबाधित राहते या साठी पक्षकार बंधूंनी लोकन्यायालयात जास्तीत जास्त प्रकरणे सामंजस्याने आपसात तडजोड करून मिटवावीत अशा प्रकारचे आवाहन केले. या प्रसंगी पाटोदा न्यायालयाचे विधीज्ञ एस.एम.कोल्हे, विधीज्ञ एन.जी.जाधव, विधीज्ञ ए.एम.जगदाळे, विधीज्ञ ऋषिकेश डबीर, विधीज्ञ अविनाश जगदाळे, विधीज्ञ आर.एस.घुले, विधीज्ञ यु.बी. जाधव, विधीज्ञ ए.एस.वैद्य, विधीज्ञ एस. आर.नागरगोजे, विधीज्ञ बाळासाहेब जावळे, विधीज्ञ पठाण यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन विधिज्ञ एस.बी.जावळे यांनी केले. या प्रसंगी वकील संघाचे सर्व विधीज्ञ न्यायालयीन कर्मचारी व पक्षकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# केंद्र अन् राज्यात महागळती सरकार-उद्धव ठाकरे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

महायुती सरकार आहे. हे डबल इंजिन सरकार आहे. ही महागळती सरकार आहे. लिकेज सरकार आहे. राम मंदिराच्या गाभ्यात लिकेज झाले. पेपरही लिक होत आहे. यांना लाज लज्जा शरम नाही, असे म्हणत माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचा महायुती सरकारवर जोरदार हल्लाबोल केला आहे. दरम्यान उद्धव ठाकरे पुढे बोलताना म्हणाले की, उद्याचा घोषणांचा पाऊस पडेल. तो गाजर संकल्प असणार आहे. निधी खर्चच होणार नाही. घोषणा खूप झाल्यात. घोषणांचा पाऊस आणि अंमलबजावणीचा दुष्काळ असतो. गेल्या दोन वर्षातील घोषणांची किती पूर्तता झाली हे खरेपणाने सांगितलं पाहिजे. हे खोके सरकार आहे, असा टोलाही त्यांनी लगावला आहे.उद्धव ठाकरे म्हणाले की, राज्याला कळत आहे, राज्यातील शेतकरी परिस्थिती भोगत आहेत. निरोपाच्या अधिवेशनात सरकारकडून मोठ्या घोषणा होण्याची शक्यता असून ते उद्याच करतील, ज्या योजना व घोषणा केल्या जातात त्यात आर्थिक तरतूद केली जाते. उद्या घोषणांचा पाऊस पडेल, पण निधीच दिला जाणार नाही, असे म्हणत उद्धव ठाकरेंनी सरकारवर हल्लाबोल केला. यावेळी,पहिल्याच पावसात राम मंदिरात झालेल्या वगळतीवरुन आणि देशभरातली पेपर फुटीवरुनही ठाकरेंनी मोदी सरकावरला लक्ष्य केले. राम मंदीराला गळती झाली, पेपर गळती झाली, असे म्हणत दोन महत्त्वाच्या मुद्द्यांवर भाष्य केलेउद्धव ठाकरे म्हणाले की, चंद्रकांतदादांनी मला चॉकलेट दिले. आता लोकांना चॉकलेट देऊ नका. आश्वासनाचे चॉकलेट देऊ नका. कुणीही यावे आणि गाजर दाखवू नका. जनता शहाणी आहे. उद्या काही घोषणा करणार असाल, लाडकी बहीण आणि लाडका भाऊ योजना आणल्यानंतर सुधीर मुनगंटीवार यांच्याकडे तिची अंमलबजावणी करायला देऊ नका. त्यांचे चंद्रपुरातील भाषण हिणकस होते, असे ठाकरेंनी म्हटले आहे.

# दुधाला हमीभाव प्रती लिटर ३५ रुपये करा-मा.मंत्री हर्षवर्धन पाटील

## दुग्धविकास मंत्री राधाकृष्ण विखे-पाटलांची मुंबईत घेतली भेट

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**इंदापूर । बबनराव धायतोंडे**

राज्यातील गावोगावी मोठा दूध उत्पादक वर्ग हा दुग्ध व्यवसायावरती अवलंबून आहे. त्यामुळे शासनाने तातडीने हा प्रश्न हाताळून दुधाचा खरेदीचा दर प्रती लिटरला किमान ३५ रू करावा.आणि हमी भाव ३५ रुपये द्यावा. अशी मागणी राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघ नवी दिल्लीचे अध्यक्ष, माजी मंत्री,भाजप नेते हर्षवर्धन पाटील यांनी राज्याचे दुग्धविकास,पशुसंवर्धन व महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचेकडे भेटीप्रसंगी मुंबईत बुधवारी (दि.२६) रोजी केली.

हर्षवर्धन पाटील म्हणाले, दुग्ध व्यवसाय हा महिला,तरुण वर्ग,शेतकरी,भूमीहीन शेतमजूर आदी मोठा वर्ग कष्टाने करून उपजीविका करीत आहे. मात्र सध्या दुधाचा दर हा प्रती लिटरला रु. २७ - २८ पर्यंत खाली आल्याने दुग्ध व्यवसाय करणारा राज्यातील हा मोठा वर्ग अडचणीत आला आहे. दुधाचा किमान खरेदी दर हा प्रती लिटरला ३५ रुपये असला पाहिजे व हा दर खाली आला तर राज्य शासनाने मध्यंतरी दोन महिने दिले तसे प्रती लिटर अनुदानही दूध उत्पादकांना दिले पाहिजे.

उसाला जसा दराबाबत एफ.आर.पी. चा कायदा आहे, तसा दूध खरेदी दराबाबतही किमान दराचा कायदा असायला हवा,असे मत हर्षवर्धन पाटील यांनी राधाकृष्ण विखे पाटील यांचेकडे व्यक्त केले. राज्यात गेली अनेक दशकांपासून दुग्ध व्यवसाय हा सर्वसामान्य जनतेची चळवळ बनली आहे.महिलावर्ग या व्यवसायात मोठ्या प्रमाणावर असून,गोरगरीब जनतेचे प्रपंच दुध व्यवसायावरती अवलंबून आहेत.

त्यामुळे राज्य शासनाने तातडीने हा प्रश्न मार्गी लावून दूधाचा खरेदी दर किमान रु. ३५ करावा, अशी मागणी यावेळी राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे हर्षवर्धन पाटील यांनी या भेटीमध्ये केली. दरम्यान,राज्य शासन दूध दराच्या प्रश्नाबाबत गंभीर असून,यासंदर्भात तातडीने बैठक घेऊन निश्चितपणे मार्ग काढला जाईल,अशी ग्वाही यावेळी दुग्धविकास मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी हर्षवर्धन पाटील यांना दिली.



हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४
This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904